दक्षता

# रासायनिक कीटकनाशकांची हाताळणी तसेच फवारणी काळजीपूर्वक करा!



**आशुतोष चिंचोळकर**
(मो.नं. ९१४६९६६२२२)
एम.एस्सी.- कीटकशास्त्र,
यवतमाळ



गेल्या काही वर्षांमध्ये रासायनिक कीटकनाशकांची फवारणी करताना विषबाधा होण्याचे प्रमाण खूप वाढताना दिसत आहे. अनेक शेतकरी बांधव, गडीमाणसे, शेतमजूर याला बळी पडून त्यांचे डोळे निकामी होणे किंवा इतर अपंगत्व अशा समस्या ओढवत आहेत. म्हणून फवारणी करताना काळजी घेणे खूप महत्त्वाचे आहे.

**कीट**कनाशक फवारताना सगळ्यात आधी त्यावर लिहिलेल्या गुणधर्मांची माहिती घेणे गरजेचे आहे. त्यावर काही चिन्हे दिलेली असतात, ज्यावरुन त्यांच्या जहालपणाचे प्रमाण कळते. यामध्ये हिरवा रंग- कमी विषारी, निळा- मध्यम विषारी, पिवळा- तीव्र विषारी आणि लाल- अतिविषारीसाठी वापरला जातो. सोबतच त्या कीटकनाशकाचा उत्पादन दिनांक आणि वापरण्याचा कालावधी पाहून घ्यावा. कालावधी संपलेले कीटकनाशक वापरु नये.

**कीटकनाशके फवारताना घ्यावयाची काळजी**

शेतात फवारणी करतेवेळी प्रथमोपचार साहित्य सोबत ठेवावे.

खाद्यपदार्थ, इतर औषधांशी कीटकनाशकांचा संपर्क येऊ देऊ नये. तसेच कीटकनाशके लहान मुलांच्या संपर्कात येणार नाहीत अशा ठिकाणी कुलूपबंद ठेवावीत. पीक, किडी व रोगनिहाय कीटकनाशकांची निवड करून शिफारशीच्या प्रमाणातच फवारणीसाठी वापरावी.

कीटकनाशक वापरण्यापूर्वी लेबल व माहितीपत्रक व्यवस्थित वाचून खबरदारीच्या सर्व सूचनांचे पालन करावे. तसेच कीटकनाशकांच्या डब्यावरील पतंगीच्या आकारची चिन्हे लक्षात घेऊन कीटकनाशक निवडून शिफारशीनुसार वापर करावा.

विषबाधित व्यक्तीला योग्य वैद्यकीय सल्ला, उपचार तसेच गरजेनुसार हॉस्पिटलमध्ये दाखल करणे सर्वाधिक महत्त्वाचे आहे.

तणनाशके फवारणीचा पंप चुकूनही कीटकनाशक फवारणीसाठी वापरू नये, गळक्या फवारणी पंपाचा वापर फवारणीसाठी करू नये.

कीटकनाशक हाताळताना नेहमी हातात हातमोजे घालावेत. कीटकनाशकाचे द्रावण हाताने न ढवळता काठीच्या सहाय्याने हातात हातमोजे घालूनच ढवळावे.

फवारणी करताना अंगरक्षक कपडे, हातमोजे, चष्मा, मास्क, टोपी, गमबूट इत्यादी साधनांचा वापर करावा व संपूर्ण शरीर झाकले जाईल याची काळजी घ्यावी.

फवारणीचे काम सुरू असताना खाणेपिणे, तंबाखूचे सेवन धूम्रपान अगर मद्यपान करू नये.

कीटकनाशके फवारणीसाठी हाता-पायावर जखम असलेल्या व्यक्तीची निवड करू नये. फवारणी एकाच व्यक्तिकडून सतत न करून घेता आळीपाळीने करून घ्यावी.

फवारणीदरम्यान नोझल गच्च झाल्यास किंवा कचरा अडकल्यास तोंडाने साफ न करता (फुंकर न मारता) तारेच्या सहाय्याने साफ करावे.

फवारणीचे काम पूर्ण झाल्यावर अंगावरील कपडे स्वच्छ धुवावेत. त्यानंतर सर्व अंग साबण लावून स्वच्छ पाण्याने धुवावे व अंग कोरड्या स्वच्छ टॉवेलने पुसून दुसरे कपडे घालावे.

कीटकनाशकाचे रिकामे डबे तसेच शेतात फेकून न देता पाण्याचे स्त्रोत- विहीर, नदीपासून दूर जमिनीत खोल गाडून टाकावे.

फवारणी करताना पंपाच्या विशिष्ट दाबानुसार फवारणीचे तुषाररूपी द्रावण बाहेर पडते. त्यामुळे फवारणाऱ्याने चालण्याचा वेग नियंत्रित करून झाडे नेमकीच सर्व बाजूंनी ओलीचिंब होऊन द्रावण थेंब-रूपाने खाली पडणार नाही याची काळजी घ्यावी.

**विषबाधित व्यक्तीची घ्यावयाची काळजी**

* विषबाधा झाल्यास वेळ न घालवता बाधित व्यक्तीस अपघात स्थानापासून सावलीच्या ठिकाणी न्यावे व ताबडतोब प्रथमोपचार करावा. * विषबाधित व्यक्तीचे अंग/ बाधित अवयव ताबडतोब साबण लावून स्वच्छ पाण्याने धुवावे व कोरड्या स्वच्छ टॉवेलने पुसावे. * कीटकनाशक पोटात गेलेले असल्यास विषबाधित व्यक्तीला ताबडतोब ओकारी करण्याची उपाययोजना करावी. * विषबाधित व्यक्तीला पिण्यासाठी दूध तसेच बिडी/ सिगारेट व तंबाखू देऊ नये. * विषबाधित व्यक्तीला थंडी वाजत असल्यास अंगावर पांघरूण द्यावे. * विषबाधित व्यक्तीचा श्वासोच्छ्वास योग्य रितीने सुरू आहे का ते तपासावे. श्वासोच्छ्वास अनियमित किंवा बंद झाल्यास त्वरित रोग्याच्या तोंडाला तोंड लावून कृत्रिम श्वासोच्छ्वास सुरू करावा. * विषबाधित व्यक्तीला झटके येत असल्यास त्याच्या दातांमध्ये मऊ कापडाची छोटी गुंडाळी टाकावी.

* विषबाधित व्यक्ती बेशुध्द पडल्यास त्याला शुध्दीवर आणावयाचे प्रयत्न करावे, परंतु काहीही खाऊ घालण्याचा प्रयत्न करू नये. * विषबाधित व्यक्तीस त्वरित कीटकनाशकांच्या माहितीपत्रकासह डॉक्टरांकडे दाखवावे किंवा दवाखान्यात दाखल करावे व डॉक्टरांच्या निगराणीत उपचार करावे. * विषबाधित व्यक्ती बरी झाल्यावर त्याची संपूर्ण वैद्यकीय तपासणी करून घ्यावी.

(अधिक माहितीसाठी कृषी विद्यापीठातील तज्ञ, कृषी विभागातील अधिकारी यांच्याशी त्वरित संपर्क करावा.) ■